जाहीर नोटीस

याद्वारे कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या विविध विभागात वापरात असलेली खालील नमुद लाकडी कपाटे नादुरुस्त आहेत. सदरची कपाटे दुरुस्त करुन घेणेसाठी संबंधित लाकडी कपाटे दुरुस्त करणा–या कारागिरांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	जिल्हा न्याया.सिंधुदुर्ग जडसंग्रह क्रमांक	तपशिल
	लाकडी कपाट	
१	२(२), ८(७६), १०, १२, १४, १८, १९, २१,	दरवाजा लागत नाही
२	२४, २७, २९, ३०	कडी लागत नाही
३	४२, ९(९९)	हँण्डल तुटलेले आहे
	लाकडी खुर्च्या	
४	७/२४, ७/६२, ७/७८, ८/१	प्लाय खराब झाले आहे
५	६/४२, ६/१९२, ६/३१२, ६/३२८, ६/१७६	हात मोडलेला आहे
	लाकडी टेबल	
६	१/१२ , ४/५३, ४/८९, ६/९, ४/१२१, २१/१२	सनमाईक खराब झालेले आहे
	लाकडी बाक	
७	१६/५१	फळी खराब झाल्याने मोडलेली आहे.
	लाकडी रॅक	
८	७	मोडलेला आहे.

अटी व शर्ती

१) वर नमुद लाकडी कपाटे दुरुस्ती करणेबाबतचे दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर "लाकडी कपाटे दुरुस्त करणेकरीता दरपत्रक" असे नमुद करावे.

२) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवज तयार करणेकामी, दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सदर लाकडी कपाटांची दुरुस्ती ही संबंधित कारागिराने या कार्यालयात येवून करावयाची आहे.

४) लाकडी कपाटे दुरुस्ती करणेसाठी लागणारे आवश्यक ते सर्व साहित्य संबंधित कारागिराने स्वतः आणावयाचे आहे.

५) सर्व लाकडी कपाटांची दुरुस्ती झाल्यानंतरच देयकाची रक्कम संबंधितांना अदा करणेत येईल.

६) जाहीर निविदेमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

७) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुकांनी **दि.२१/११/२०२५** पर्यंत आपली दरपत्रके या कार्यालयात सादर करावीत.

दिनांकः- ११/११/२०२५

11/11/25.
सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./ ६७६५ सन २०२५,
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः- ११/११/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर-

१) मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस
२) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस
३) मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस
४) मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी/वेंगुर्ला/कुडाळ/ दोडामार्ग/मालवण/देवगड/कणकवली
५) मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस
६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , सिंधुदुर्ग-ओरोस
७) मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांजकडे नोटीसबोर्डवर व संकेतस्थळावर
८) डी.एस.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांजकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता